# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहेः

| अ.क्र. | अपील क्रमांक | २५०६+२७०३+२७३२+२७३३+२७९९+२८१५/पुणे |
|---|---|---|
| १ | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | श्री.राचय्या बाळय्या झुल्पी<br>सर्व्हे नं.३७, ससाणे कॉलनी, केशवनगर, मुंढवा, पुणे-३६ |
| २ | जन माहिती अधिकारी | १) सहाय्यक संचालक (लेखा), सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, पुणे -१<br>२) संघटन व कार्यपध्दती अधिकारी, आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, पुणे -१<br>३) वरिष्ठ प्रशासन अधिकारी, आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, पुणे -१ |
| ३ | अपिलीय प्राधिकारी | सह आयुक्त, पशुसंवर्धन (मुख्यालय) आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, पुणे -१ |

| अ.क्र. | अपील क्रमांक | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | २५०६/पुणे | वरिष्ठ प्रशासन अधिकाऱ्यांची पदे केव्हापासून निर्माण झाली ? श्री.सु.बा.गायकवाड प्रशासन अधिकारी यांच्या कामाबाबत व निर्धारण बाबतची माहिती व अनुषंगिक एकूण ७ मुद्दे | दि.२०.०१.२००९ रोजीच्या ' विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. तथापि जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचेशी चर्चा न करता अपीलकर्ता श्री.झुल्पी कार्यक्रमामधून निघून गेल्याचे प्रपत्रामध्ये नमूद करण्यात आले आहे. प्रश्नार्थक माहिती देण्यात आली नाही. ऊर्वरीत माहिती देण्यात आली असून परत देण्याची तयारी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रामध्ये व्यक्त केलेली आहे. |
| २ | २७०३/पुणे | वाहन अग्रिमावरील व्याजाची अतिरिक्त करण्यात आलेली वसुली अनुषंगिक ५ मुद्दे | याच विषयावर श्री.झुल्पी यांचे आयोगाकडील अपील (क्र.२४९८/पुणे) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नसल्याने दि.१८.११.२००८ रोजीचे आदेशान्वये निकाली काढण्यात आले. एकाच विषयावर, विषय नाकारल्यानंतर पुन्हा अपील करणे ही कृती योग्य नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | २७३२/पुणे | आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ कार्यालयातील लेखाधिकारी या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्याबाबतची माहिती | सदर माहिती देण्याकरिता रु.१,१३०/- भरणा करण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता श्री.झुल्पी यांना अवगत केले. तथापि सदरचा खर्च वाजवी आहे का, अशी विचारणा श्री.झुल्पी यांनी केली. त्याचे उत्तर पत्र प्राप्त झाले नसल्याचे श्री.झुल्पी यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीमध्ये सांगितले. त्यानुसार जन माहिती अधिकारी त्याची प्रत देण्यास तयार असताना त्याची प्रत नको असल्याचे श्री.झुल्पी यांनी सांगितले. माहितीचे शुल्क श्री.झुल्पी यांनी भरले नसल्यामुळे माहिती देण्यात आलेली नाही, असे अपिलीय प्राधिकारी यांचे निकालपत्रात नमूद केले आहे. अपीलकर्त्यास शुल्क भरणे आवश्यक होते. त्याऐवजी अवाजवी पत्रव्यवहार केल्याचे दिसते. |
| ४ | २७३३/पुणे | अधिक्षक पदावर मी (श्री.झुल्पी) दि.०१.०६.१९९६ पासून कार्यरत आहे. तसेच दि.०१.०१.२००७ च्या ज्येष्ठता सूचीप्रमाणे माझा जेष्ठता क्र.९ असे हे खरे आहे काय ? व अधिक्षक पदावरील पदभार व अनुषंगिक मुद्दे. | अपिलीय प्राधिकारी यांचे आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी (अपीलकर्ता श्री.झुल्पी यांना) दिलेली माहिती चुकीची व अपूर्ण असल्यामुळे परिपूर्ण माहिती मिळण्याची व विहित वेळेत माहिती न दिल्याने भरणा केलेली रक्कम रु.६०/- व इतर खर्चाची रक्कम मिळण्याची मागणी श्री.झुल्फी यांनी केली आहे. संबंधित माहिती अपुरी व चुकीची असल्याचे अपीलकर्त्याचे प्रतिपादन सिध्द होत नाही. |
| ५ | २७९९/पुणे | १) श्री.झुल्पी यांचे निलंबन आदेश व विभागीय चौकशी ज्ञापन दि.०६.११.२००८ बाबतच्या दोन्ही मूळ नस्त्यांच्या पान क्र.१ ते शेवटच्या पानापर्यंत पानांची स्वाक्षांकित झेरॉक्सची मागणी.<br>२) डॉ.प्र.ल.काकडे, सह आयुक्त पशुसंवर्धन व श्री.द.दा.बोरकर वरिष्ठ प्रशासन अधिकारी यांच्या कोल्हापूर दि.०८.०९.२००८ व ०९.०९.२००८ दौरा दैनंदिनीची प्रत व प्रवासभत्ता देयकाची मूळ नस्तीसह स्वाक्षांकित प्रत इ. | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१) (छ) (ज) अन्वये माहिती देता येत नाही व त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती माहितीचा अधिकार अधिनियम मधील कलम ११(१) अनुसार संबंधित अधिकाऱ्याचे माहिती प्रकट करावी किंवा कसे याबाबतचे लेखी संमती पत्र संबंधितांकडून प्राप्त झाले किंवा कसे, हे अपिलीय प्राधिकारी यांनी आदेशामध्ये स्पष्ट केलेले नाही. करणे आवश्यक होते. मागितलेली माहितीत त्रयस्थ पक्ष तरतूद लागू होत नाही. माहिती नि:शुल्क द्यावी. |
| ६ | २८१५/पुणे | वाहन अग्रिमावरील दंडव्याज व मुद्दल वसुलीबाबत दिलेला आदेशानुसार (दि.२३.०९.२००८) अग्रिमाबाबतची माहिती ११ मुद्दे | वाहन अग्रिमाचे विषयावर आयोगाकडे यापूर्वी दोन अपिले (अपील क्र.२७०३ व २४९८/पुणे, आदेश झाले आहेत.) केली असताना व त्यातील एक निकाली काढल्यावर पुन्हा त्याच विषयाच्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | अनुषंगानेच नवीन मुद्दे उपस्थित करुन माहितीचा अर्ज व अपील दाखल करणे योग्य नाही. |

## विवेचन

श्री. झुल्पी यांना त्यांच्या वर्तणुकीमुळे निलंबित केलेले असून त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे. त्यांनी या कार्यालयाच्या अंतर्गत असलेल्या वेगवेगळ्या कक्षांकडे माहिती मागवून कार्यालयाला त्रास देण्याचा त्यांचा हेतू दिसतो, असे अपिलीय प्राधिकारी तथा सह आयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय),पुणे-१ श्री.पी.एल.काकडे यांनी आयोगाला पाठविलेल्या दि.२०.०१.२००९ रोजीच्या निवेदनात नमूद केले आहे.

श्री.झुल्पी यांनी आयोगाकडे दि.०१.१०.२००८ रोजी दाखल केलेल्या, वाहन अग्रिमावरील व्याजाच्या अतिरिक्त करण्यात आलेली वसुलीबाबतचे अपील क्र.२४९८/पुणे आयोगाने निकाली काढलेले आहे. तरीही त्याच विषयावर व अनुषंगिक मुद्दे उपस्थित करुन पुनः पुन्हा (अपील क्र.२७०३ व २८१५) अर्ज व अपिले ते दाखल करीत असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. अशा प्रकारे सर्व यंत्रणांच्या व कार्यालयीन कार्यशक्तीचा अपव्यय करणे योग्य नाही, याची समज अपीलकर्ते श्री.झुल्पी यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील अपिले अ.क्र. १ ते ६ ( क्रमांक २५०६, २७०३, २७३२, २७३३ २७९९ व २८१५) दाखल स्तरावर निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दिनांक :** ३०/०४/२००९

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक २४.०२.२००९ व **२५.०२.२००९** रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अक्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २६७५ / पुणे | श्री.अशोक बबनराव नागवडे एच ५/१५ एस.टी.कॉलनी, पुणे सातारा रस्ता, पुणे ९ | आगार व्यवस्थापक (क) वरिष्ठ, राज्य परिवहन महामंडळ, स्वारगेट आगार, वीर सावरकरनगर, पुणे ३७ | विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, पुणे विभाग, शंकरशेठ रस्ता, पुणे ३७ | स्वारगेट आगारातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या सहलीच्या अनुषंगाने एकूण ०४ मुद्यांची माहिती | माहिती दिली आहे. मात्र सहली बंद करण्यात आल्याने अपील निकाली काढण्याबाबत प्रपत्रात उभयतांनी नमूद केले आहे. |
| २ | २६८५ / पुणे | संभाजी मधूकर चव्हाण मु.पो.रेडणी, ता.इंदापूर, जि.पुणे | उपविभागीय पोलीस अधिकारी बारामती विभाग, ता.बारामती, जि.पुणे | पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण पोलीस, चव्हाणनगर, पाषाण, पुणे | दि.१०.०६.२००८ रोजी रेडणी येथील किती केसेस बावडा पोलीस दूरक्षेत्राला दिल्या व अपीलकर्त्याच्या दि.१९.०६.२००८ रोजीच्या अर्जावर काय कारवाई करण्यात आली याबाबत माहिती | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपिलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | २६८४ / पुणे | श्री.अशोक सुरेश मोरे मु.पो.सणसवाडी, ता.शिरुर, जि.पुणे | सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.,शिक्रापूर, | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.,शिक्रापूर, | वीज जोडप्रक्रीया त्यासाठी येणारा खर्च, इ.बाबत एकूण ३ मुद्यांची माहिती | अपिलकर्त्याने शुल्क भरलेले नाहि. ते भरल्यानंतर माहिती देण्यात येईल, असे जन |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | जि.पुणे | जि.पुणे | | माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | २७८८/ पुणे | श्री.उमेश बळवंत इनामदार ए-३, स्वामीपुरम, २१६०, सदाशिव पेठ, पुणे ३० | भू-सर्वेक्षण अधिकारी, प्रादेशिक व्यवस्थापक, एम.आय.डी.सी., जोग सेंटर, २ रा मजला, वाकडेवाडी, पुणे-३ | प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक व्यवस्थापक, एम.आय.डी.सी., जोग सेंटर, २ रा मजला, वाकडेवाडी, पुणे-३ | मौजे आंबी, ता.मावळ, जि.पुणे येथील गट क्र.४८३ या जमीनीच्या भू संपादनाबाबत एकूण ४ मुद्यांची माहिती | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | २७८१/ पुणे | श्री.सोनोपंत भागूजी दांगट चैतन्य निवास, कृष्णानगर, रोड नं.२, नवी सांगवी, पुणे-२७ | माहिती अधिकारी, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, महाराष्ट्र राज्य, बी.जे.मेडिकल गर्ल्स हॉस्टेलसमोर, पुणे-१ | अपिलीय प्राधिकारी, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, महाराष्ट्र राज्य, बी.जे.मेडिकल गर्ल्स हॉस्टेलसमोर, पुणे -१ | मौजे बाणेर, ता.हवेली येथील सर्व्हे नं.३३/२ खरेदी बाबतचा दस्त क्र.१३४/८५ मिळणेबाबत | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ५ (क्रमांक २६७५, २६८५, २६८४, २७८८ व २७८१ ) निकाली काढण्यात येत आहेत.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १५-०४-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्रीमती सरीता दिनकरराव आबक — अपीलकर्ता
ज्ञानमंदिर हायस्कूल आळे,
ता.जुन्नर, जि.पुणे

अपिलीय प्राधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद,पुणे — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
शिवांजली विद्या निकेतन,
चाळकवाडी, ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८०० + २८०७/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०६.११.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.११.१२.२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.११.११.२००८ |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br>अपीलकर्त्याचे माहे २००८ चा वेतन दाखला व कार्यमुक्त केल्याचा दाखला | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्रीमती सरिता दिनकरराव आबक यानी त्यांच्या माहे २००८ चा वेतन दाखला व सेवामुक्त केल्याचा दाखला मागितला होता.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवांजली विद्या निकेतन, चाळकवाडी यांनी माहिती दिली असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, पुणे यांनी त्यांच्या दिनांक

११.१२.२००८ रोजीच्या निर्णयात नमूद केले आहे. तसेच दाखला मागणी करण्यासंबंधात संबंधित नियमानुसार अर्ज करणे आवश्यक आहे. आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दिनांक : ३०-४- .२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २८३९/ पुणे | सौ.मालती मधुकर साळवे संत तुकाराम महाराज को.ऑ.हौ.सोसायटी, विद्यानगर (टिंगरेनगर),पुणे-१५ | उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ | संत तुकाराम महाराज को.ऑ.हौ.सो.विद्यानगर,पुणे या संस्थेचे खरेदीखत, नोंदणी पत्र, बांधकामाचा मंजूर नकाशे ३ एकूण १० मुद्यांची माहिती. |
| २ | ११५८/ पुणे | श्री.झेड एच एफ मोलाई ३०९ क्लोव्हर व्हिलेज कार्लाइस कोर्ट,ऑ.हौ.सो. लि.,सर्व्हे नं.६६/६७, वानवडी,पुणे-४० | सहकारी अधिकारी (श्रेणी-१), अधिन, उपनिबंधक, सह संस्था, पुणे शहर (२) | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे शहर (२), पुणे | क्लोव्हर व्हिलेज कार्लाइस कोर्ट,ऑ.हौ.सो. वानवडी या संस्थेच्या संचालक मंडळाने कलम ७३ (१) प्रमाणे नमुना २० मध्ये बंधपत्र करुन दिले असेल तर त्यांच्या प्रती मिळणेबाबत |
| ३ | ११५९/ पुणे | श्री.झेड एच एफ मोलाई ३०९ क्लोव्हर व्हिलेज कार्लाइस कोर्ट,ऑ.हौ.सो. लि.,सर्व्हे नं.६६/६७, वानवडी,पुणे-४० | सहकारी अधिकारी (श्रेणी-१), अधिन, उपनिबंधक, सह संस्था, पुणे शहर (२) | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे शहर (२), पुणे | क्लोव्हर व्हिलेज कार्लाइस कोर्ट,ऑ.हौ.सो., वानवडी या संस्थेच्या संचालक मंडळाने कलम ७३ (१) प्रमाणे नमुना २० मध्ये बंधपत्र करुन दिले असेल तर त्यांच्या प्रती मिळणेबाबत |
| ४ | ११६०/ पुणे | श्री.झेड एच एफ मोलाई | विशेष लेखा परीक्षक (वर्ग- | जिल्हा विशेष लेखापरीक्षक | सन २००२-२००३ या कालावधीतील क्लोव्हर व्हिलेज कार्लाइस |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ३०९ क्लोव्हर व्हिलेज कार्लाइस कोर्ट,ऑ.हौ.सो. लि.,सर्व्हे नं.६६/६७, वानवडी,पुणे-४० | १) सहकारी संस्था, पुणे | (वर्ग-१) सहकारी संस्था, पुणे | कोर्ट,ऑ.हौ.सो. वानवडी कोर्ट,ऑ.हौ.सो., वानवडी या संस्थेचा लेखापरीक्षण अहवाल |

## विवेचन

नियंत्रक अधिकारी म्हणून उपरोक्त सहकारी गृहनिर्माण संस्थांची जी माहिती सहकार खात्याच्या संबंधित कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे, ती त्या त्या कार्यालयांनी अर्जदारांना देणे बंधनकारक आहे. त्यानुसार या कार्यालयाने कार्यवाही करुन आयोगास दि.०५.०४.२००९ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील अपिले तक्त्यातील अनुक्रमांक १ ते ४ (क्रमांक २८३९, ११५८, ११५९ व ११६० ) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. ०८-०४-२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.०४.०४.२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता.

| अ.क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २८६८ /पुणे | श्री. विलास सोमा गोर्डे द्वारा रमेश नारायण पोटे मु.पो.पिपरी-पेंडार, (पोटे-आळी), जि.पुणे | व्याख्याता, बाळासाहेब जाधव, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळे, ता.जुन्नर, जि.पुणे | प्राचार्य, बाळासाहेब जाधव, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळे, ता.जुन्नर, जि.पुणे | अपीलकर्त्याचा पूर्णवेळ प्रस्ताव पाठविणे व सह संचालकांना दिलेल्या वेळापत्रकांच्या कार्यालयीन प्रतीच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती व जावक क्रमांक मिळणेबाबत | अपीलकर्त्यास दि.२०.०४.२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. मात्र पूर्ण वेळ प्रस्ताव पाठविणे ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| २ | २९१७ /पुणे | श्री.प्रकाश रघुनाथ पाचारणे मु.पो.राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे | यंत्र अभियंता, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे विभागीय कार्यालय, शंकरशेठ रोड, पुणे-३७ | विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे विभागीय कार्यालय, शंकरशेठ रोड, पुणे-३७ | यांत्रिक पदाच्या बढती परीक्षेबाबत व दि.०१.०७.२००६ रोजी दफ्तर दिरंगाई कायदा लागू झाला याबाबत एकूण ४ मुद्यांची माहिती | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | २९१८ /पुणे | श्री.प्रकाश रघुनाथ पाचारणे | यंत्र अभियंता, महाराष्ट्र राज्य | विभागीय नियंत्रक, | माहितीचा अधिकार | आवश्यक ती माहिती |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मु.पो.राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे | मार्ग परिवहन महामंडळ, पुणे विभागीय कार्यालय, शंकरशेठ रोड, पुणे-३७ | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे विभागीय कार्यालय, शंकरशेठ रोड, पुणे-३७ | अधिनियम २००५ अंतर्गत नियम ४ नुसार माहिती प्रमुख कारागीर पदाबाबत व इलेक्ट्रीशियन कारागिराबाबत एकूण ५ मुद्यांची माहिती | मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) वरील सर्व अपिले अनुक्रमांक १ ते ३ (क्रमांक २८६८, २९१७ व २९१८ ) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र.२८६८ मध्ये विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत एकमत झाले असून त्यानुसार पुर्तता करुन अहवाल आयोगास सादर करावा. माहिती व पूर्तता अहवाल विशिष्ट मुदतीत प्राप्त न झाल्यास शास्ती व अन्य कारवाईस संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी पात्र राहतील.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

पुणे
दि. ३० -०४ -२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.०४.०४.२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता.

| अ.क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २८७१ /पुणे | श्री.सुभाष आर.पाटील ३ जेल रोड, येरवडा, पुणे-६ | सहाय्यक अभियंता, शहर अभियंता कार्यालय, शिवाजीनगर, पुणे | नगर अभियंता, शहर अभियंता कार्यालय, शिवाजीनगर, पुणे | टीडीआर व एफएसआय संदर्भात वेळोवेळी सादर करण्यात आलेली परिपत्रके इ.च्या प्रती | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले. |
| २ | २६९३ /पुणे | श्री.रविंद्र सदाशिव यादव स.नं.१५०/३, मोहनवाडी, आळंदी रोड, येरवडा, पुणे-६ | माहिती अधिकारी, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय, विद्युत विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे | उपआयुक्त, ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय, विद्युत विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे | संगमवाडी क्षेत्रिय कार्यालयातील विद्युत विभागाच्या कामकाजाच्या अनुषंगाने एकूण ९ मुद्याची माहिती | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले. |
| ३ | २८६७ /पुणे | श्री.अनंत देऊ गावडे स.नं.३६/२, विद्यानगर लेन नं.६, वल्ड वॉटर बँक, पुणे १५ | कार्यकारी अभियंता कार्यालय, 'ब' प्रभाग स्थापत्य, पीसीएमसी, चिंचवड गांव, पुणे ३३ | कार्यकारी अभियंता, 'ब' प्रभाग स्थापत्य, पीसीएमसी, चिंचवड गांव, पुणे ३३ | आपल्या कार्यालयाचे पत्र प्रस्था/चिंच/७/कावि/७१/२००७,दि. १८.०५.२००९ या संबंधीच्या नस्तीमधील कागदपत्रांच्या नकला मिळणेबाबत | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २९२७ /पुणे | श्री.राजेश वसंतराव कांबळे मु.पो.माळेगाव कॉलनी, ता.बारामती, जि.पुणे | मंडल कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी बारामती, ता.बारामती, जि.पुणे | तालुका कृषी अधिकारी बारामती, ता.बारामती, जि.पुणे | सन २००८ या वर्षात गुलछडी पिकासाठी आलेले अनुदान एकूण लागवडीचे क्षेत्र संबंधित शेतकऱ्यांची नावे इ.३ मुद्यांची माहिती | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्यांने प्रपत्रात नमूद केले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील सर्व अपिले अनुक्रमांक १ ते ४ (क्रमांक २८७१, २६९३, २८६७ व २९२७) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३० -०४ -२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.०४.०४.२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता.

| अ.क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्यांचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २९२६ /पुणे | सौ.कमल विकास राऊत 'इंदूमती', स.नं.६०,साईनगर गल्ली, क्र.७, कोंढवा बु., पुणे-४८ | सचिव, इंडियन एज्युकेशन सोसायटी, स.नं.५९, साईनगर, कोंढवा बु., पुणे-४८ | अध्यक्ष, इंडियन एज्युकेशन सोसायटी, स.नं.५९, साईनगर, कोंढवा बु., पुणे-४८ | दैनिक 'लोकमत' दि.०४.०६.२००८ रोजी आलेल्या शिक्षक व लिपिक पदाच्या जाहिरातीच्या अनुषंगाने एकूण ५ मुद्यांची माहिती | आवश्यक ती माहिती १० दिवसांत देण्याचे अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | २८२५ /पुणे | श्री.ज्ञानेश्वर मुरलीधर भोसले रा.तरडोबाची वाडी, ता.शिरुर, जि.पुणे | कार्यकारी अभियंता (प्रशा-१), यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., केडगाव, ता.दौंड, जि.पुणे | कार्यकारी अभियंता (प्रशा-१), यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., केडगाव, ता.दौंड, जि.पुणे | सन २००८ या कालावधीतील शिरुर ग्रामीण भागातील मीटर रीडिंग व ठेकेदाराबाबत माहिती | आवश्यक माहिती १० दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | २८२६ /पुणे | श्री.ज्ञानेश्वर मुरलीधर भोसले रा.तरडोबाची वाडी, ता.शिरुर, जि.पुणे | कार्यकारी अभियंता (प्रशा-१), यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., केडगाव, | कार्यकारी अभियंता (प्रशा-१), यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., केडगाव, ता.दौंड, | दि.०१.०१.२००७ ते ०१.१०.२००८ या कालावधीत शिरुर येथील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीतील वायरमन, क्लार्क | आवश्यक माहिती १० दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ता.दौंड, जि.पुणे | जि.पुणे | हेल्पर या पदाबाबत माहिती | |
| ४ | २८६६ /पुणे | श्री.मनोहर ठकुजी वाळके टिंगरेनगर, स.नं.३६/१, विसावा बिल्डिंग, मु.पो.धानोरी, ता.हवेली, जि.पुणे | जन माहिती अधिकारी, प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा, पुणे-६ | अधीक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा, पुणे-६ | व्हाईट हाऊस या मिळकतीचे भाडे हे सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरुन दिल्याप्रमाणे भरण्यात येते या रिपोर्टची प्रत व इतर कागदपत्रे | अपीलकर्त्यास दि.०८.०४.२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | २९१३/ पुणे | श्री.जालिंदर यादव बुलाखे मु.पो.सिध्दार्थनगर, घर नं.२२५, ता. शिरुर, जि.पुणे | शाखा अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ, शिरुर, ता.शिरुर, जि.पुणे | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ, शिरुर, ता.शिरुर, जि.पुणे | माहे एप्रिल २००५ ते मार्च २००८ अखेर नवीन किती ग्राहकांना वीज कनेक्शन दिले त्याबाबत माहिती | आवश्यक ती माहिती १० दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ६ | २९३२ /पुणे | श्री.रसुल हुसेन इनामदार आळंदी देवाची, नवीन शॉ सेंटर, गाळा क्र.७, पाण्याच्या टाकीजवळ, ता.खेड,जि.पुणे | मुख्याध्यापिका, शाळा क्र.१, आळंदी नगरपरिषद, शिक्षण मंडळ, आळंदी, ता.खेड, जि.पुणे | प्रशासन अधिकारी, आळंदीनगर परिषद, शिक्षण मंडळ, आळंदी, ता.खेड, जि.पुणे | दि.१ जानेवारी २००६ ते दि.१ डिसेंबर २००८ या कालावधीत शाळा क्र.१ च्या मुख्याध्यापकांनी केलेले वार्षिक नियोजन, कॅश बुक नोंदी, पोषण आहार व बांधकामाबाबत माहिती | आवश्यक माहिती ३ दिवसात उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी : अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) वरील सर्व अपिले अनुक्रमांक १ ते ६ (क्रमांक २९२६, २८२५, २८२६, २८६६, २९१३ व २९३२) निकाली काढण्यात येत आहेत.

२) विशिष्ट मुदतीत अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत उभयपक्षांमध्ये एकमत झाले असे वरील अपिलांमध्ये नमूद केले असून त्यानुसार तातडीने पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्त न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्तीस व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० -०४ -२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २९५३/ पुणे | श्री. गणेश सदाशिव मेंगडे मु.स.नं.८८, गुजरात कॉलनी, प्लॉट नं.१०, कोथरूड, पुणे-३८ | तहसीलदार, मुळशी, ता.मुळशी, जि. पुणे | उप विभागीय अधिकारी, मावळ उपविभाग, मावळ | तहसीलदार मुळशी येथील न्यायालयातील कु.का./वशी /३२.ग/१६ /२००६ मौजे मुगावडे येथील जमीन गट नं.७६१, ७६५ चे संदर्भात | अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपील केलेले आढळत नाही. |
| २ | २९५८/ पुणे | श्री. बापू हणुमंत बंडगर रा.राहीनगर, बंडगर वस्ती, माळेगाव बु. ता.बारामती, जि. पुणे | माहिती अधिकारी तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, ४१२-ई, शिवाजीनगर, बहिरट पाटील चौक जवळ, पुणे-१६ | प्रभारी सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४१२, ई शिवाजीनगर, पुणे- १६ | संचालक, विमुक्त जाती भटक्या जमाती, व इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, म.रा., पुणे यांनी कळविल्या प्रमाणे सदर पत्रावर सह संचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे यांनी केलेल्या कार्यवाही -बाबत अर्जदारास आजपर्यंत काहीही कळविले नाही, याचा खुलासा मिळणेबाबत | जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये खुलासा विचारता येत नाही. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | २९५९/ पुणे | श्री. रमेश पांडुरंग कांबळे मु.पो. पेठ, ता. आंबेगाव, जि. पुणे | उप अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, पुणे-१ | अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, पुणे-१ | जलसंपदा विभाग, पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, पुणे-१, अधीक्षक अभियंता यांना दि. २३.४.२००८ रोजी आलेल्या महाराष्ट्र राज्य, सामान्य प्रशासन विभागाने शिपाई भरतीबाबत निर्गमित केलेल्या परिपत्रकाची प्रत | मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. संबंधित जी.आर. बाबत जन माहिती अधिकारी यांनी वस्तुस्थिती कळवावी. |
| ४ | २९७६/ अपील | सौ. मीना सुभाष कलगुटकर जी-७, शिवनगरी सोसायटी, भुजबळ टाऊनशिप मागे, कोथरूड, पुणे-३८ | जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मार्ग परिवहन, शंकरशेठ रोड, पुणे-३७ | विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, मार्ग परिवहन, शंकरशेठ रोड, पुणे-३७ | ग्रॅच्युइटीची रक्कम कमी दिली. पत्र पाठवून दखल घेतली नाही, तसेच पेन्शन बाबत दखल घेतली नाही. | मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| ५ | २९८८/ पुणे | श्री. विजय प्रभाकर घोगळे १/३ कुशावर्त सोसायटी, भांगरवाडी, लोणावळा, पुणे | निवासी नायब तहसीलदार, मावळ, ता.मावळ, जि. पुणे | तहसीलदार, मावळ, ता.मावळ, जि. पुणे | अभिलेख कक्षात किती कर्मचारी, अधिकारी संख्या व सद्यस्थिती. दप्तरी अर्ज दिल्यानंतर सदर अर्ज टेबलावर किती दिवस फिरतो इत्यादी | जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | २९८९/ पुणे | श्री. दादा गुलाब देशमुख रा. लोणी खुर्द, ता. राहाता, जि.अहमदनगर | सहाय्यक अभियंता श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, बारामती, जि. पुणे | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, पुर्व विभाग, पुणे-१ | या वर्षात झालेली लहान -मोठी कामे कोणती, पूर्ण - अपूर्ण शाखा अभियंता बदलीचे ठिकाणी राहतात का, इत्यादी. | जन माहिती अधिकारी यांचे उत्तर योग्य आहे. अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात येत आहे. |
| ७ | ३००१/ पुणे | श्री. किशोर लक्ष्मण निमल रा.४८६, हिमगिरीनाथ हौसिंग सोसायटी लि., खडकी बाजार, पुणक-३ | उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे शहर (२), पुणे | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ | ५१२ कामगार सहकारी ग्रामीण संस्था मर्यादित, खडकी या संस्थेच्या सभासद समितीच्या दुष्कृत्याबाबत २ मे २००८ रोजी केलेल्या अर्जावर झालेली कार्यवाही | अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यात नमूद केलेली अनु.क्र. १ ते ७ अपिले (क्र. २९५३, २९५८,२९५९, २९७६,२९८८, २९८९ व ३००१ ) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. २०.४.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.हसमुख शिवाभाई पटेल
५५, इंद्रप्रस्थ कॉम्प्लेक्स, ५८९, रास्ता पेठ, पुणे-४११०११ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४४ / पुणे /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.०८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ प्रतिनिधी श्री.प्रवीण गेडाम

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री.श्याम ढवळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.७.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.७.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सिटी सर्व्हे नं.५५३/१, ५८९, ५८९/अ/१ रास्ता पेठ, पुणे-११ येथील नवीन बांधकामाकरिता मंजूर केलेल्या पार्किगच्या नकाशाची प्रमाणित प्रत व त्याप्रमाणे काम झाले असल्याचे अभियंत्याच्या रिपोर्टची प्रमाणित प्रत. दि.५.४.९९ व ३.८.९९ च्या तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीची प्रत, जा.क्र.बीसीओ/५६३३, दि.२.७.१९९९ या पत्राला बिल्डर्सनी दिलेल्या उत्तराची प्रत, उत्तर न दिल्यास त्याबाबत म.न.पा.काय कार्यवाही करते त्याची प्रत, लोकशाही दिन टोकन नं.१३२ व ३८५ दि.७.४.२००३ ची सुनावणी झाली त्या संदर्भातील आयुक्तांनी केलेल्या टिपणीचया व मिनिटसच्या प्रती, आपल्या जा.क्र.बीसीओ/ ३०३, दि.२२.४.२००३, ४८१, दि.२५.४.२००३, ११२९,११३० दि.२२.५.२००३, या पत्राच्या प्रती व त्यांना दिलेली उत्तरे, आमच्या अर्जावरील/तक्रारीवरील दैनिक अहवाल, महानगरपालिकेच्या नियमाची प्रमाणित प्रत, दि.२७.७.१९९९ च्या पत्रावर केलेली कारवाई, दि.१६.१९९९ पासून किती विकासक व आर्किटेक्ट यांच्यावर कारवाई केली त्याचा तपशील इत्यादी माहिती. | |

## विवेचन

मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम न झाल्याबाबतची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी आपल्याला दिली नाही म्हणून अपीलकर्ता श्री.हसमुख शिवाभाई पटेल यांनी अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ यांच्याकडे अपील केले. उपलब्ध कागदपत्रांच्या छायांकित प्रती शुल्क घेऊन अपीलकर्त्यांना त्वरित देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ यांनी कनिष्ठ अभियंता श्री.महिंद्रकर यांना दिला. त्यानुसार दिलेली माहिती ही अपुरी व चुकीची असल्याच्या कारणावरुन श्री.पटेल यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.पटेल यांनी या विषयाबाबत अनेक अर्ज केले असून माहितीच्या अधिकारातील त्यांच्या दि.१५.४.२००६ च्या अर्जावर दि.२८.४.२००६ रोजी शुल्क भरण्यास कळविण्यात आले होते. त्यांनी शुल्क भरल्यानंतर व कागदपत्रे उपलब्ध करण्यात आल्यानुसार त्यांना माहिती देण्यात आली. मात्र अधिकारी नागरिकांच्या मानसिक छळाला जबाबदार नाहीत का, दि.१६.२.१९९९

पासून किती डेव्हलपर आणि आर्किटेक्ट इ.च्यावर आपण कोणती कार्यवाही केली आहे, अशा स्वरुपाची विचारणा श्री.पटेल यांनी काही मुद्दयांमध्ये केली आहे, तर जी कारवाई केलीच गेलेली नाही व कागदपत्रे दाखल झालेली नाहीत त्यांची प्रतींसह माहिती काही मुद्दयांमध्ये मागितली आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.श्याम ढवळे यांनी नमूद केले.

बिल्डरविरुध्द श्री.पटेल यांची अंतर्गत तक्रार असून ती दूर करण्यासाठी कारवाई करावी, अशी त्यांची मुख्य मागणी आहे, असेही जन माहिती अधिकारी श्री.ढवळे यांनी सांगितले. श्री.पटेल यांच्या अर्जातील मागण्या पाहता जन माहिती अधिकाऱ्यांचे हे प्रतिपादन रास्त ठरते. अशा प्रकारच्या मागण्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाहीत. मात्र या मागणीच्या अनुषंगाने काही बाबी अपीलकर्त्यास स्पष्ट करणे आवश्यक असून जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्याला त्याबाबत कळवावे, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. त्यानुसार पूर्तता केल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ यांनी दि.२६.८.२००८ रोजी आयोगाला सादर केला.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१.४.२००९**